सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**Government Of Maharashtra**

**Office of the Director General of Police, Maharashtra State**

Maharashtra State Police Headquarters, Shahid Bhagat Singh Marg, Colaba, Mumbai 400 001

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र,विभागीय,भाग-६-अकरिता)**

क्र. पोमसं/८/६८०/पदोन्नती(उप सहा.२०२१-२२)/२३/२०२२(सीई-३८३) दिनांक ०४/११/२०२२

वाचा :- शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक रापोसे ११२२/प्र.क्र.९०/पोल-१ अ, दि.०३/११/२०२२.

**-:आदेश:-**

संदर्भाधिन दि.०३/११/२०२२ च्या शासन आदेशानुसार (प्रत संलग्न) पोलीस महासंचालकांच्या शहर लिपिक संवर्गातील व कार्यालयातील खालील नमूद वरिष्ठ कार्यालय अधीक्षक (गट-ब) दर्जाच्या अधिकाऱ्यांना पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गट-अ) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे. सदर शासन आदेशास अनुसरुन त्यांची पदोन्नतीवर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्रीमती अंजली एकनाथ वराडकर | पो.म.सं. कार्यालय (का.क्र.२४) | पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (गुन्हे) | संवर्गातील रिक्त पदात |
| २. | श्रीमती कल्पना किसन लोखंडे | पो.म.सं. कार्यालय (का.क्र.१६-अ) | पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (लेखा) | संवर्गातील रिक्त पदात |
| ३. | श्री. दिपक विठ्ठल खेमकर | पो.म.सं. कार्यालय (का.क्र.१६) | पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (गोपनीय) | संवर्गातील रिक्त पदात |

२. उपरोक्त पदोन्नती, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तसेच सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरती स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा (regularization) व सेवाज्येष्ठतेचा (seniority) कोणताही हक्क असणार नाही.

३. सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.०७/०५/२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून उक्त पदोन्नती देण्यात येत आहे.

३. उपरोक्त अधिकाऱ्यांनी विद्यमान पदाचा कार्यभार सोडण्यापूर्वी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची यादी करुन ती पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (र.व का) यांच्याकडे सुपूर्द करावी. तसेच, त्यांना पदोन्नतीवर हजर झाल्यानंतर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पीअेच्वाय/ १०८२/ सीआर/ ११००(२)/ अेसूईआर्-३, दि.०६/११/१९८४ नुसार विकल्प द्यावयाचा असेल, तर तो त्यांनी पदोन्नतीवर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १महिन्याच्या आंत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन)नियम, ११(१)(अ)अन्वये केली जाईल यांची त्यांनी नोंद घ्यावी.

४. पदोन्नत झालेल्या वरिष्ठ कार्यालय अधीक्षकांचे अभिनंदन.

**रजनिश सेठ,**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :-

१. श्रीमती अंजली एकनाथ वराडकर, का.क्र.२४
२. श्रीमती कल्पना किसन लोखंडे, का.क्र.१६-अ
३. श्री.दिपक विठ्ठल खेमकर, का.क्र.१६

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, गृह विभाग,मंत्रालय,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२.
(लक्षवेध:- ,पोल-१अ)

**प्रत सस्नेहअग्रेषित:-**

अधिदान व लेखा अधिकारी,वांद्रे(पूर्व),मुंबई.

प्रत:-

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक (का.वसु.)/(प्रशासन) /(आस्थापना) / (नि.वस.), महाराष्ट्र राज्य,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) /(का.व सु.),महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक,(का.वसु.)/(नि.वस./दक्षता),मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (पुर्नरचना)
सर्व कार्यासन अधिकारी,का.क्र.१ ते ४४.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष,मुंबई

२. सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे एक महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

नियमित निवडसूची, २०२१-२२:

*पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या आस्थापनेवरील "शहर लिपिक" संवर्गातील "उपसहायक" या पदावर पदोन्नती देणेबाबत.*

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्र. रापोसे-११२२/प्र.क्र.९०/पोल-१अ.
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.

दिनांक : ०३ नोव्हेंबर २०२२.

संदर्भ :-
१) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.
२) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र पोमसं/ ८/५/६८०/उपसहायक-(२१-२२)/२३/२०२२, दि.१९.०४.२०२२ व २१.६.२०२२.

शासन आदेश.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या आस्थापनेवरील "शहर लिपिक" संवर्गातील "उपसहायक" या पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या "वरिष्ठ कार्यालय अधीक्षक" या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या "नियमित निवडसूची, २०२१-२२" यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद अधिका-यांना, "उपसहायक" या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत आहे-

| अ.क्र. (१) | अधिका-याचे नाव (२) |
|---|---|
| १. | श्रीम. अंजली एकनाथ वराडकर |
| २. | श्रीम.कल्पना किसन लोखंडे |
| ३. | श्री. दीपक विठ्ठल खेमकर |

<u>अटी</u>:-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी पुढील उचित कार्यवाही करावी.

३. हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने *[अनौपचारिक संदर्भ क्र.८२८/२०२२/का.-१२, दिनांक २१.०७.२०२२]* निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११०३१९१४१५२८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, pseudonym=E15DEDF011CBE07295FC54DEC7494CDD2EBE3FA9, serialNumber=8538CD1E408948F7D025537D5F6589BD8958D1B95322E66D2CC5EDF89AD0D79E, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2022.11.03 19:17:09 +05'30'

**(स्वप्निल गोपाल बोरसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री, गृह, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) संबंधित अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत)*.
५) निवड फाईल, पोल-१अ.